# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ पुणे
## कोल्हापूर विभागीय मंडळ , कोल्हापूर
### ५३९ कसबा करवीर राजेंद्र नगर कोल्हापूर- ४१६ ००४

website : **www.sscboardkolhapur.in** **E-Mail: divsec.kop@ gmail.com**


क्रं /कोविमं/उमा/गोपनीय/ 742
कोल्हापूर ४१६ ००४
दिनांक :- ०३/०८/२०२१

प्रति,

प्राचार्य/मुख्याध्यापक,
सर्व मान्यता प्राप्त कनिष्ठ महाविद्यालये,
सातारा/सांगली/कोल्हापूर

विषय - उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) परीक्षा सन-२०२१ सुधारीत मूल्यमापन कार्यपध्दतीनुसार जाहीर केलेल्या निकालाबाबत विद्यार्थ्यांच्या तक्रारींचे निराकरण...
संदर्भ - क्रं.रा.मं./परीक्षा-६/४४४०/पुणे-४११ ००४/दि.०२/०८/२०२१

उपरोक्त विषयाच्या संदर्भीय पत्रास अनुसरुन कळविण्यात येते की, उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) परीक्षा सन-२०२१ सुधारीत मूल्यमापन कार्यपध्दतीनुसार जाहीर केलेल्या निकालावर विद्यार्थ्यांच्या तक्रारींचे निराकरणाबाबत विद्यार्थ्यांना काही आक्षेप किंवा तक्रारी असतील तर त्याच्या निराकरणासाठी मंडळ स्तरावर व्यवस्था निर्माण करण्यात आलेली आहे.

त्यानुषंगाने आपल्या स्तरावर आपल्या कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना व पालक यांचे निदर्शनास आणून दयावे तसेच निकालासंदर्भात काही आक्षेप किंवा तक्रारी असल्यास सोबत जोडलेले ' प्रपत्र - अ ' उपलब्ध करुन देण्याची व्यवस्था करावी.

सोबत - १. क्रं.रा.मं./परीक्षा-६/४४४०/पुणे-४११ ००४/दि.०२/०८/२०२१ चे पत्र
२. प्रपत्र ' अ '

(देविदास कुलाळ)
मा. विभागीय सचिव,
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर

Maharashtra State Board of
Secondary & Higher Secondary Education, Pune
S.R.No.832-A, Final Pl No. 178,179, Near Balchitrawani, Behind Agharkar Research Institute, Bhamburda, Shivajinagar, Pune-411004.

महाराष्ट्र राज्य
माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे
स.न.८३२-ए, फा.प्लॉ.नं.१७८,१७९,बालचित्रवाणी शेजारी,आघारकर रिसर्च इन्स्टिटयूटच्या मागे, भांबुर्डा, शिवाजीनगर, पुणे ४११००४

E-Mail- secretary .stateboard @ gmail.com

Tel : Chairman (p) : STD . (020)-25651751 । EPABX -25705000 Secretary(P) : STD . (020)- 25651750

क्र.रा.मं./परीक्षा-६/४४४०
पुणे-४११००४
दि.-०७/०८/२०२१

प्रति,

विभागीय सचिव,
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व
उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
सर्व विभागीय मंडळे.

**विषय- उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) परीक्षा सन २०२१ सुधारित मूल्यमापन कार्यपध्दतीनुसार जाहीर केलेल्या निकालाबाबत विद्यार्थ्यांच्या तक्रारींचे निराकरण......**

**संदर्भ- मा. सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली यांनी दिलेला दि.२४/०६/२०२१ रोजीचा निकाल.**

उपरोक्त विषयाच्या संदर्भिय निकालास अनुसरुन कळविण्यात येते की, मा. सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली येथे उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) परीक्षा सन २०२१ च्या संदर्भात रिट याचिका क्र.६२०/२०२१ दाखल करण्यात आलेली आहे. सदर याचिकेबाबत मा. सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली यांनी दि.२४/०६/२०२१ रोजीच्या निकालानुसार इ.१२ वी परीक्षेचा निकाल सुधारित मूल्यमापन कार्यपध्दतीनुसार जाहीर झाल्यानंतर सदर निकालावर विद्यार्थ्यांना काही आक्षेप किंवा तक्रारी असतील तर त्याच्या निराकरणासाठी मंडळ स्तरावर व्यवस्था निर्माण करण्याबाबत आदेशित केलेले आहे.

त्याअनुषंगाने मंडळामार्फत इ.१२ वी परीक्षेचा मूल्यमापन कार्यपध्दतीनुसार निकाल जाहीर केल्यानंतर विद्यार्थ्यांना सदर निकालावर काही आक्षेप/तक्रारी असतील तर त्या नोंदविण्यासाठी व त्यांचे निराकरण करण्यासाठी मंडळामार्फत सर्व विभागीय मंडळासाठी तक्रार निवारण अधिकारी यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे. यासाठी तक्रार निवारण अधिकारी म्हणून विभागीय मंडळातील विभागीय सहसचिव हे काम पाहतील.

संबंधित विद्यार्थी यासंदर्भातील आपला तक्रार अर्ज टपाल/ई-मेल/व्यक्तिशः उपरोक्त तक्रार निवारण अधिकाऱ्यांकडे सादर करु शकतील. यासाठी मंडळामार्फत विहित करण्यात आलेल्या (प्रपत्र-अ) नमून्यात विद्यार्थ्यास अर्ज करावा लागेल. सदर अर्जाचा नमूना या पत्रासोबत पाठविण्यात येत आहे. विद्यार्थ्याने मागणी केल्यास सदर अर्जाची प्रत उपलब्ध करुन दयावी. तक्रार निवारण अधिकारी, कार्यालयीन कामाच्या १० दिवसात सदर अर्ज निकाली काढून विद्यार्थ्यांच्या तक्रारीच्या अनुषंगाने परिपूर्ण वस्तुस्थिती पत्र/ई-मेलद्वारे अवगत करतील. विद्यार्थ्यास सदर उत्तराच्या अनुषंगाने काही अडचणी असल्यास संबंधित विभागीय मंडळातील विभागीय सचिव/विभागीय अध्यक्ष यांच्याशी संपर्क साधतील.

तरी, उपरोक्तबाबत विभागीय मंडळ स्तरावरुन इ.१२ वी परीक्षेचा सुधारित मूल्यमापन कार्यपध्दतीनुसार निकाल जाहीर केल्यानंतर आवश्यक व्यवस्था निर्माण करुन कार्यवाही करण्यात यावी.

(डॉ.अशोक भोसले)
सचिव,
राज्य मंडळ, पुणे - ०४

# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे ४११००४.

# प्र क ट न

**विषय** :- उच्चा माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) परीक्षा सन २०२१ सुधारित मूल्यमापन कार्यपध्दतीनुसार जाहीर केलेल्या निकालाबाबत विद्यार्थ्यांच्या तक्रारींचे निराकरण...

---

कोविड -१९ च्या प्रादुर्भावामुळे उद्भवलेल्या असामान्य परिस्थिती विचारात घेऊन सन २०२०-२१ या शैक्षणिक वर्षासाठी महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत आयोजित करण्यात आलेली उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) परीक्षा दि.११ जून, २०२१ च्या शासन निर्णयानुसार रद्द करण्यात आली. तद्नंतर दि.०२ जुलै २०२१ च्या शासन निर्णयानुसार उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) परीक्षेसाठी मंडळाकडे नोंदणी केलेल्या विद्यार्थ्यांचे मूल्यमापन करुन त्यांना गुणपत्रक/प्रमाणपत्र देण्यासाठी सुधारित मूल्यमापन कार्यपध्दती निश्चित करण्यात आली आहे. त्यानुसार मंडळामार्फत सदर मूल्यमापन कार्यपध्दतीच्या अमंलबजावणीबाबत तपशीलवार परिपत्रक, परिशिष्टे तयार करुन दि. ०५/०७/२०२१ च्या पत्राद्वारे सर्व विभागीय मंडळे व उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालये यांना पाठविण्यात आली व त्यानुसार निकालाची कार्यवाही करण्यात आली आहे.

तथापि, मा. सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली येथे उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) परीक्षा सन २०२१ च्या संदर्भात रिट याचिका क्र.६२०/२०२१ दाखल करण्यात आलेली आहे. सदर याचिकेबाबत मा. सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली यांनी दि.२४/०६/२०२१ रोजीच्या निकालानुसार सदर परीक्षेचा निकाल सुधारित मूल्यमापन कार्यपध्दतीनुसार जाहीर झाल्यानंतर सदर निकालावर विद्यार्थ्यांना काही आक्षेप किंवा तक्रारी असतील तर त्याच्या निराकरणासाठी मंडळ स्तरावर व्यवस्था निर्माण करण्याबाबत आदेशित केलेले आहे.

त्याअनुषंगाने महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत इ.१२ वी परीक्षेचा सुधारित मूल्यमापन कार्यपध्दतीनुसार निकाल जाहीर केल्यानंतर विद्यार्थ्यांना सदर निकालावर काही आक्षेप/तक्रारी असतील तर त्या नोंदविण्यासाठी व त्यांचे निराकरण करण्यासाठी मंडळामार्फत संबंधित विभागीय मंडळ स्तरावर तक्रार निवारण अधिकारी यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे. यासाठी तक्रार निवारण अधिकारी म्हणून विभागीय मंडळातील विभागीय सहसचिव हे काम पाहतील. सदर तक्रार निवारण अधिकारी तथा विभागीय सहसचिव यांचे पत्ते, दूरध्वनी क्रमांक व ई-मेल आयडी खालीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र | विभागीय मंडळाचे नाव | विभागीय सहसचिव/सहा.सचिव यांचे नाव व पत्ता | भ्रमणध्वनी क्रमांक | ई-मेल आयडी |
|---|---|---|---|---|
| १ | पुणे | श्रीम.प्रिया शिंदे, सहसचिव<br>पुणे विभागीय मंडळ,पुणे. | 9689192899 | sscboardpune@gmail.com |
| २ | नागपूर | श्रीम.माधुरी सावरकर, सहसचिव<br>नागपूर विभागीय मंडळ,नागपूर | 9403614142 | msboardnagpur@gmail.com |
| ३ | औरंगाबाद | श्री.राजेंद्र पाटील, सहसचिव<br>औरंगाबाद विभागीय मंडळ, औरंगाबाद | 9922900825 | chair.aurboard@mahedu.gov.in |
| ४ | मुंबई | श्री.मुश्ताक शेख, सहसचिव<br>मुंबई विभागीय मंडळ, मुंबई | 7020014714 | sschsc.mumbaiboard@gmail.com |

| अ.क्र | विभागीय मंडळाचे नाव | विभागीय सहसचिव/सहा.सचिव यांचे नाव व पत्ता | भ्रमणध्वनी क्रमांक | ई-मेल आयडी |
|---|---|---|---|---|
| ५ | कोल्हापूर | श्री.देविदास कुलाळ, सहसचिव<br>कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर | 7588636301 | divsec.kop@gmail.com |
| ६ | अमरावती | श्रीम.जयश्री राऊत, सहसचिव (प्र.)<br>अमरावती विभागीय मंडळ, अमरावती | 9960909347 | divsecamt@rediffmail.com |
| ७ | नाशिक | श्रीम. एम.यु.देवकर, सहसचिव (प्र.)<br>नाशिक विभागीय मंडळ, नाशिक | 8888339423<br>7755903427 | nsksec@rediffmail.com |
| ८ | लातूर | श्री.संजय पंचगल्ले, सहसचिव (प्र.)<br>लातूर विभागीय मंडळ, लातूर | 9421694282 | divsecretarylatur@gmail.com |
| ९ | कोकण | श्रीम.भावना राजनोर, सहसचिव<br>कोकण विभागीय मंडळ, रत्नागिरी | 8806512288 | divchairman.konkan@gmail.com |

संबंधित विद्यार्थी यासंदर्भातील आपला तक्रार अर्ज टपाल/ई-मेल/व्यक्तिशः उपरोक्त तक्रार निवारण अधिकाऱ्यांकडे सादर करु शकतील. यासाठी मंडळामार्फत विहित करण्यात आलेल्या (प्रपत्र-अ) नमून्यात विद्यार्थ्यास अर्ज करावा लागेल. सदर अर्जाचा नमूना विभागीय मंडळ स्तरावर तसेच मंडळाच्या www.mahahsscboard.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन दिलेले आहे. तक्रार निवारण अधिकारी, कार्यालयीन कामाच्या १० दिवसात सदर अर्ज निकाली काढून विद्यार्थ्यांच्या तक्रारीच्या अनुषंगाने परिपूर्ण वस्तुस्थिती पत्र/ई-मेलद्वारे अवगत करतील. विद्यार्थ्यास सदर उत्तराच्या अनुषंगाने काही अडचणी असल्यास संबंधित विभागीय मंडळातील विभागीय सचिव/विभागीय अध्यक्ष यांच्याशी संपर्क साधावा. तरी याबाबतची सर्व प्राचार्य, उच्च माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालय, शिक्षक, विद्यार्थी, पालक व इतर सर्व संबंधित घटकांनी नोंद घ्यावी.

दि. 02/०८/२०२१

(डॉ. अशोक भोसले)
सचिव
राज्यमंडळ, पुणे - ०४

'प्रपत्र- अ'

## महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे-०४

### उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) परीक्षा सन २०२१

### निकालासंदर्भात तक्रार निवारण अधिकाऱ्याकडे करावयाचा अर्ज

प्रति,

तक्रार निवारण अधिकारी तथा विभागीय सहसचिव:-----------------------------------

(विभागीय मंडळाचे नाव व पत्ता) : -----------------------------------

१. विद्यार्थ्याचे संपूर्ण नाव:------------------------------ बैठक क्रमांक :-----------

२. पत्रव्यवहारासाठी पूर्ण पत्ता:---------------------------------------------------

---------------------------------------------------

ई-मेल आयडी (असल्यास) ---------------------------------------------------

३. तक्रारीचा तपशील:---------------------------------------------------

---------------------------------------------------

---------------------------------------------------

---------------------------------------------------

---------------------------------------------------

४. तक्रार अर्जासोबत जोडलेले दस्ताऐवज (असल्यास )-

१. ---------------------------------------------------

२.---------------------------------------------------

३. ---------------------------------------------------

५. तक्रारीच्या निराकरणासंदर्भात माहिती/उत्तर कशी हवी आहे:------------------------
टपालाने, ई-मेलने की व्यक्तिशः
(साध्या पोष्टाने, रजिस्टर्ड पोष्टाने किंवा स्पीड पोष्टाने)

ठिकाण-

तारीख-

अर्जदाराची स्वाक्षरी

(उपरोक्त तक्रार अर्ज विद्यार्थ्याने टपाल/ई-मेल/व्यक्तिशः तक्रार निवारण अधिकाऱ्यांकडे सादर करावा. तक्रार निवारण अधिकाऱ्यांनी सदर अर्जाची पोहोच देऊन कार्यालयीन कामाच्या १० दिवसात सदर अर्ज निकाली काढावा व विद्यार्थ्यांच्या तक्रारीच्या अनुषंगाने परिपूर्ण वस्तुस्थिती पत्राद्वारे अवगत करावी.)